रयत शिक्षण संस्थेचे,

# सी. डी. जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर.

## सूचना (परीक्षा विभाग)

## एफ.वाय. / एस. वाय.बी. कॉम. (2024 NEP Pattern)

## परीक्षा मार्च/एप्रिल २०२६

दि.०८/०४/२०२६

एफ.वाय./एस. वाय.बी. कॉम. **(2024 NEP Pattern)** या वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने **मार्च/एप्रिल २०२६** साठी परीक्षा फॉर्म भरण्याच्या तारखा जाहीर केलेल्या आहेत.

ऑनलाईन परीक्षा फॉर्म भरल्यानंतर विद्यार्थ्यांनी परीक्षा फॉर्मवर प्रिंट झालले **विद्यार्थ्यांचे नाव (बारावीच्या गुणपत्रानुसार), मोबाईल नंबर, आधार नंबर, Eligibility Number, ABC आयडी, ईमेल आयडी, विषय व स्वतःची स्वाक्षरी हे बारकाईने स्वतः पडताळणी करुन पहावे.**

ऑनलाईन परीक्षा फॉर्म भरल्यानंतर Print Preview बटनावर क्लिक करुन डाऊनलोड झालेल्या परीक्षा अर्जाची प्रिंट आऊट काढून सदर फॉर्मसोबत **एफ.वाय.बी.कॉम. मधील विद्यार्थ्यांनी सत्र-१ व एस. वाय.बी. कॉम. मधील विद्यार्थ्यांनी सत्र-३** चे गुणपत्रक जोडावे.

**सदर परीक्षा फॉर्मवर खालील यादीतील वर्गानुसार प्राध्यापकांच्या सहया घेणे आवश्यक आहे.**

| अ.नं. | वर्ग | प्राध्यापकाचे नाव | अ.नं. | वर्ग | प्राध्यापकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | एफ.वाय.बी.कॉम. | डॉ घंगाळे एस.डी.<br>डॉ. खत्री ए.एस.<br>प्रा. नागपूरे व्ही.बी.<br>प्रा.दातीर के.आर.<br>प्रा.पेरणे एस.बी.<br>प्रा. गायकवाड ए.आर. | १ | एस.वाय.बी.कॉम. | प्रा. कुलकर्णी एस.व्ही.<br>डॉ. यादव पी. एस.<br>डॉ. घोलप एम. ए.<br>डॉ. साळवे एन.बी. |

वरील प्राध्यापकांच्या स्वाक्षरी घेतल्यानंतर कार्यालयात **श्री. गुंजाळ एस. व्ही.** यांच्याकडून तो फॉर्म इनवर्ड करुन घ्यावा. त्यानंतर विद्यार्थ्यांनी स्वतः चे विद्यापीठ लॉगीन करुन सदर परीक्षा शुल्क ऑनलाईन भरण्यासाठी Pay Online या बटनावर क्लिक करुन ऑनलाईन स्वरुपात परीक्षा शुल्क त्वरीत भरावे. अन्यथा विद्यापीठ नियमानुसार सदर शुल्क विहीत वेळेत भरले न गेल्यास आपणांस विद्यापीठ नियमानुसार विलंब शुल्क लागू होईल. विलंब शुल्कासह परीक्षा फॉर्म भरण्याची मुदत संपल्यानंतर आपला परीक्षा अर्ज आपोआप रद्द होईल व परीक्षा शुल्क भरता येणार नाही. त्यामुळे होणा-या शैक्षणिक नुकसानीस संबंधित विद्यार्थी स्वतः जबाबदार राहिल याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घेऊन परीक्षा अर्ज व शुल्क विहीत वेळेत भरुन परीक्षा अर्जाची पूर्तता करावी.

**परीक्षा फॉर्म भरण्याची अंतिम मुदत १३/०४/२०२६ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत)** पर्यंत आहे. विहीत मुदतीत परीक्षा फॉर्म न भरणा-या विद्यार्थ्यांच्या होणा-या शैक्षणिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही. याची सर्व परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. अधिक माहितीसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे संदर्भ क्र. परीक्षा/छावता/४३३ दि. २८/०३/२०२६ चे परिपत्रक सोबत जोडले आहे, त्याचे अवलोकन करावे.

महाविद्यालय परीक्षा अधिकारी

Chandraroop Dakale Jain College of Commerce, Shrirampur

for प्राचार्य

सी. डी. जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,

श्रीरामपूर

University Table/E/C.D.Jain College /Shri Gunjal S.V./Exam Notice

Scanned with OKEN Scanner

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)

परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
दूरध्वनी क. (०२०) २५६२ १३९८
Website: www.unipune.ac.in

Board of Examinations & Evaluation
Ganeshkhind, Pune – 411 007
Telephone: (020) 2562 1398
E-mail: coe@unipune.ac.in
bee@unipune.ac.in

**संदर्भ क्र.:** परीक्षा/छावता/४७३ **दिनांक :** ०६/०४/२०२६

प्रति
**मा. प्राचार्य/संचालक,**
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
प्रस्तुत विद्यापीठ
(पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्हा व दादरा-नगर हवेली)

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील उन्हाळी सत्र २०२६ परीक्षा अर्ज : टप्पा क्रमांक ३**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील उन्हाळी सत्र २०२६ परीक्षा अर्ज सुरू करण्यात आलेले आहेत. मंगळवार दिनांक ०७/०४/२०२६, दुपारी १२.०० पासून सोबत जोडलेल्या यादीतील अभ्यासक्रमांच्या उन्हाळी सत्र २०२६ परीक्षांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया व वेळापत्रक याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे.

| विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज ऑनलाईन भरण्याचा विनाविलंब कालावधी | महाविद्यालय/परिसंस्थेने विनाविलंब परीक्षा अर्ज कायम (Inward) करण्याचा व विद्यार्थ्यांनी विनाविलंब परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम कालावधी | विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज ऑनलाईन भरण्याचा विलंब कालावधी | महाविद्यालय/परिसंस्थेने विलंब परीक्षा अर्ज कायम (Inward) करण्याचा व विद्यार्थ्यांनी विलंब परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम कालावधी | विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज ऑनलाईन भरण्याचा अतिविलंब कालावधी | महाविद्यालय/परिसंस्थेने अतिविलंब परीक्षा अर्ज कायम (Inward) करण्याचा व विद्यार्थ्यांनी अतिविलंब परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ७/४/२०२६ दुपारी १२ पासून ते १३/४/२०२६ | ७/४/२०२६ ते १५/४/२०२६ (कायम – सायंकाळी ५) (परीक्षा शुल्क – रात्री १२) | — | — | — | — |

कळावे,

आपला,

**(प्रा. डॉ. प्रभाकर देसाई)**
**प्रभारी संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**सोबत :**
१)मंगळवार दिनांक ७/४/२०२६, दुपारी १२.०० पासून परीक्षा अर्ज सुरू होणाऱ्या अभ्यासक्रमांची यादी.
२)शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील उन्हाळी सत्र २०२६ परीक्षा अर्जाबाबत मार्गदर्शक सूचना

Scanned with OKEN Scanner

मंगळवार दिनांक ०७/०४/२०२६, दुपारी १२.०० पासून परीक्षा अर्ज सुरू होणाऱ्या अभ्यासक्रमांची यादी.

| Sr.No. | Faculty_Name | Pattern_Name |
|---|---|---|
| 1 | Commerce and Management | B.Com (Business Management) 2024 Credit Pattern |
| 2 | Commerce and Management | B.Com (Computer Application) 2024 Credit Pattern |
| 3 | Commerce and Management | B.Com (International Business) 2024 Credit Pattern |
| 4 | Commerce and Management | Bachelor of Commerce 2024 Credit Pattern |
| 5 | Humanities | Bachelor of Arts 2024 Credit Pattern |
| 6 | Science and Technology | B.Sc. (Biotech) 2024 Credit Pattern |
| 7 | Science and Technology | B.Sc. (Computer Application) 2024 Credit Pattern |
| 8 | Science and Technology | B.Sc. (Computer Science) 2024 Credit Pattern |
| 9 | Science and Technology | B.Sc. (Cyber and Digital Science) 2024 Credit Pattern |
| 10 | Science and Technology | B.Sc. (Hospitality Studies) 2024 Credit Pattern |
| 11 | Science and Technology | B.Sc. (Regular) 2024 Credit Pattern |

(प्रा. डॉ. प्रभाकर देसाई)
प्रभारी संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

Scanned with OKEN Scanner

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दिनांक : २८/०३/२०२६

## शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील उन्हाळी सत्र २०२६ परीक्षा अर्जाबाबत मार्गदर्शक सूचना

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील उन्हाळी सत्र २०२६ चे परीक्षा अर्ज विविध टप्प्यात सुरू करण्यात येत आहेत, त्यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना पुढीलप्रमाणे :—

१. सर्व अभ्यासक्रमांचे विहित शुल्क, विलंबशुल्क आणि अतिविलंब शुल्कासह परीक्षा अर्ज विहित मुदतीतच संबंधित लिंकद्वारे ऑनलाईन पद्धतीने भरण्याची व कायम करण्याची प्रक्रिया विद्यार्थी व महाविद्यालय/परिसंस्थानी काटेकोरपणे पार पाडावी.

२. संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेने आपल्या महाविद्यालयातील एकूण विद्यार्थी आणि विषयवार विभागांचे प्रमुख तसेच विषयशिक्षक यांचे प्रमाण लक्षात घेऊन प्रत्येक प्राध्यापकास किमान २५ विद्यार्थी किंवा त्या प्रमाणात नेमून द्यावेत आणि अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज तपासून खात्री करण्याची सर्व प्रकारची जबाबदारी संबंधित विभाग/विभाग प्रमुख व विषय प्राध्यापकावर निश्चित करावी, म्हणजे यामुळे विद्यार्थ्यांने भरलेला व सादर केलेला अर्ज बिनचूकपणे तपासून कायम (Inward) करता येईल.

३. यानुसार विद्यार्थ्याने परीक्षा अर्ज ऑनलाईन भरण्यापूर्वी अथवा ऑनलाईन भरण्याच्या पहिल्या दिवशी प्रत्येक महाविद्यालयाने/परिसंस्थेने परीक्षा अधिकारी यांच्या साहाय्यासाठी प्रत्येक विषयाचे विभागप्रमुख, प्रत्येक विषयाचे प्राध्यापक यांच्या मदतीने प्रत्येक वर्गाचे अभ्यासक्रमांच्या पॅटर्ननुसार त्या त्या सत्रातील परीक्षा अर्जात कोणकोणते विषय असावेत, त्याचे अनुक्रमांक आणि त्यासंदर्भातील सर्व माहिती याचे प्रारूप महाविद्यालयातील प्रत्येक प्राध्यापकास, प्रत्येक विद्यार्थ्यास आणि परीक्षा प्रक्रियेत सहभागी कार्यालयीन कर्मचाऱ्यास उपलब्ध करावे. यामुळे संबंधित विद्यार्थ्यास आपला परीक्षा अर्ज भरणे आणि २५ विद्यार्थी नेमून दिलेल्या प्राध्यापकास तो तपासून देणे व परीक्षा प्रक्रियेत सहभागी कार्यालयास तो कायम करणे नेमकेपणाने शक्य होईल.

४. महाविद्यालय/परिसंस्थेतील प्रत्येक विद्यार्थी लॉगिनद्वारे स्वत:च्या प्रोफाईलमधून परीक्षा अर्ज भरण्याच्या लिंकवर प्रवेशित होईल. प्रोफाईलमधून जी माहिती परीक्षा अर्जावर अवतीर्ण झाली आहे त्याची खातरजमा संबंधित विद्यार्थ्याने करावी आणि त्यानंतर संबंधित विद्यार्थी स्वत:च्या अभ्यासपत्रिकांची (Courses) खात्री करून परीक्षा अर्ज भरेल. त्यानंतर परीक्षा अर्ज महाविद्यालयाच्या यंत्रणेकडून तपासून घेण्यासाठी संबंधित विद्यार्थी आपला Preview अशी अक्षरे असलेला अर्ज प्रिंट करेल आणि महाविद्यालयातून तपासून घेईल.

५. विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन भरलेला अर्ज अथवा प्रिंट काढून सादर केलेला अर्ज महाविद्यालयाच्या डॅशबोर्डवर अंकित होताच महाविद्यालयाने संबंधित अर्ज तात्काळ तपासून तो कायम करणे अनिवार्य आहे. यासाठी प्रत्येकी २५ विद्यार्थ्यांचा ऑनलाईन ग्रुप तयार करण्याची आणि त्यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी नेमलेल्या प्राध्यापकावर सोपवावी.

६. प्रत्येक विद्यार्थ्याच्या परीक्षा अर्जात नमूद विद्यार्थ्याचे नाव, अभ्यासक्रमाचे नाव, अभ्यासपत्रिकांची नावे (Courses), अभ्यासपत्रिकांचा कोड, विद्याशाखा, लेखी (Theory), प्रात्यक्षिक (Practical), सत्रातंर्गत लेखी परीक्षा (Insem), मौखिक (Oral), सत्रकार्य (Termwork), प्रबंधिका (Dissertation), प्रकल्प (Project), क्षेत्रीय प्रकल्प (Field Project), कामकाजकालीन अनुभवाचे प्रशिक्षण (On Job Training), संशोधन प्रकल्प (Research Project), Tutorial यासह संबंधित अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने ज्या बाबी अथवा निर्देश आवश्यक आहेत ते तपासून सदर अर्ज तात्काळ कायम (Inward) करणे अनिवार्य आहे.

७. महाविद्यालयाने/परिसंस्थेने परीक्षा अर्ज कायम (Inward) केल्यानंतरच संबंधित विद्यार्थ्यांस ईमेल अथवा टेक्स्ट मेसेजद्वारा सूचना मिळेल, त्यानंतर विद्यार्थ्याने स्वत:च्या प्रोफाईलमध्ये लॉगिन करुन ऑनलाईन स्वरुपात उपलब्ध असलेल्या गेटवेद्वारे खालील रकान्यात नमूद केलेल्या कालावधीत परीक्षाशुल्क भरणे अनिवार्य आहे. अन्यथा संबंधित विद्यार्थ्यास आपोआप विलंब अथवा अतिविलंब शुल्क अदा करावे लागेल.

८. विद्यार्थ्याने ऑनलाईन परीक्षाशुल्क भरल्यानंतर सदर विद्यार्थ्याचा परीक्षा अर्ज परीक्षाविषयक पुढील प्रक्रियेकरिता कायम होईल आणि त्यानुसार त्याचे परीक्षेसाठीचे ओळखपत्र तयार होईल.

९. विद्यार्थ्याने परीक्षा अर्ज अचूक भरावा आणि परीक्षा अर्ज अचूक भरल्याची खातरजमाही संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेने करावी. परीक्षा अर्ज कायम झाल्यानंतर परीक्षा ओळखपत्रामध्ये कोणत्याही परिस्थितीमध्ये बदल/सुधारणा करता येणार नसल्यामुळे याची काटेकोरपणे दक्षता संबंधितांनी घ्यावी. परीक्षा अर्ज कायम केल्यानंतर अभ्यासपत्रिका नोंद अथवा काढून टाकण्याची सुविधाही कोणत्याही परिस्थितीत देण्यात येणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

१०. **महाविद्यालया/परिसंस्थेने वर दर्शवल्याप्रमाणे कोणत्याही टप्प्यावर परीक्षा अर्ज कायम (Inward) केल्यानंतर विद्यार्थ्यांनी तात्काळ परीक्षा शुल्क ऑनलाईन स्वरुपात अदा करणे अनिवार्य आहे.** अन्यथा संबंधित विद्यार्थ्यांस आपोआप त्यापुढील विलंब/अतिविलंब शुल्क आकारले जाईल. तसेच विहीत मुदतीनंतर विद्यार्थी परीक्षा अर्ज व परीक्षा शुल्क भरू शकणार नाहीत आणि पर्यायाने संबंधित विद्यार्थ्याचा परीक्षा अर्ज विद्यापीठाकडे जमा होणार नाही आणि विद्यार्थ्यास परीक्षेपासून वंचित रहावे लागेल, याची विद्यार्थ्यांनी व संबंधित सर्व घटकांनी नोंद घ्यावी.

तसेच विद्यार्थ्याने परीक्षा अर्ज वेळेत भरून महाविद्यालय/परिसंस्थेकडे ऑनलाईन जमा केल्यावर आणि Preview Print सादर केल्यावर जर संबंधित महाविद्यालया/परिसंस्थेकडून विद्यार्थ्याचा अर्ज विशिष्ट परीक्षा अर्ज प्रक्रिया पत्रकात दिलेल्या कालमर्यादेत कायम झाला नाही तर संबंधित विद्यार्थ्यास भराव्या लागणाऱ्या विलंब अथवा अतिविलंब शुल्काचा भार आपोआपच महाविद्यालय/परिसंस्थेवर पडेल.

११. सर्व महाविद्यालये/परिसंस्था, प्राचार्य/संचालक, प्राध्यापक, विभागप्रमुख, महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी, परीक्षा सहायक कर्मचारी, विद्यार्थी व पालक यांना आवाहन करण्यात येते की, महाविद्यालय/परिसंस्थेतील सर्व पात्र विद्यार्थ्यांचे/पाल्यांचे विहित मुदतीत अचूक परीक्षा अर्ज भरणे, तपासून कायम करणे आणि परीक्षा शुल्कही विहित कालावधीतच ऑनलाईन स्वरूपात भरणे; तसेच कोणताही पात्र विद्यार्थी/पाल्य परीक्षेपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

तसेच विहित मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत परीक्षा अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ मिळणार नाही. कारण अशी मुदतवाढ झाल्यास परीक्षार्थी ओळखपत्र, बारकोड जुळणी आणि परीक्षार्थीच्या अभ्यासविषयांची निश्चिती करताना समस्या निर्माण होतात. परिणामी प्राचार्य/संचालक, विभागप्रमुख, प्राध्यापक, परीक्षा अधिकारी, विद्यार्थी यांनाच स्थानिक पातळीवर रोषास सामोरे जावे लागते; पर्यायाने विद्यापीठ परीक्षा आयोजनावरही आणि त्याअनुषंगाने परीक्षा निकालांवर विपरित परिणाम होतो.

१२. उन्हाळी सत्र २०२६ परीक्षांचे अर्ज कायम करताना संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेने परीक्षार्थी विद्यार्थ्याची ७५टक्के उपस्थिती किंवा विशेष परिस्थितीत उपस्थिती विषयी नियमानुसार क्षमापित प्रक्रिया करून जी उपस्थिती अध्यादेशानुसार मान्य आहे ती आणि सत्रपूर्ततेची काळजी घेणे अनिवार्य असून यासंदर्भातील सर्व कागदपत्रे महाविद्यालय स्तरावर जतन करून ठेवणे बंधनकारक आहे. यासंदर्भातील सर्व जबाबदारी प्राचार्य/संचालक यांची राहील. तसेच अर्ज कायम केल्यानंतर ज्या विद्यार्थ्यांची हजेरी ७५टक्के पेक्षा कमी असेल अशा विद्यार्थ्यांचे अर्ज मागे घेण्यासाठी प्रस्ताव महाविद्यालयानी पाठवू नयेत.

१३. महाविद्यालय/परिसंस्थेतील विद्यार्थी प्रथम सत्रामध्ये काही कारणास्तव परीक्षा अर्ज भरण्यापासून वंचित राहिले असतील परंतु त्यांनी त्यांचे शैक्षणिक काम पूर्ण केले असेल अशा विद्यार्थ्यांचे दोन्ही सत्रांचे एकत्रित परीक्षा अर्ज भरण्यासाठी महाविद्यालयामार्फत त्यांच्या दोन्ही सत्रातील अंतर्गत मूल्यमापन पूर्ण झाले असून या विद्यार्थ्यांची दोन्ही सत्रामध्ये हजेरी ही ७५ टक्के पेक्षा जास्त असल्याचे हमी पत्र देऊन परीक्षा विभागात विहीत मुदतीत जमा करावे. परीक्षा विभागामार्फत दोन्ही सत्राचे एकत्रित परीक्षा अर्ज उपलब्ध करुन देण्यात येईल.

१४. दिव्यांग विद्यार्थ्याच्या बाबतीत परीक्षा अर्ज कायम करताना महाविद्यालय/परिसंस्था स्तरावर यासंदर्भातील सर्व कागदपत्रे जतन करणे आणि परीक्षा नियोजन कालावधीत संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षाकालीन अनुरूप सुविधा उपलब्ध करून देणे, वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय/परिपत्रक/पत्रानुसार बंधनकारक आहे, याची नोंद घ्यावी.

१५. परीक्षा अर्ज भरण्यातील प्रक्रियेदरम्यान येणाऱ्या अडचणी व त्रुटींसाठी ०२०-७१५३३६३३ या दूरध्वनीवर अथवा examsupport@pun.unipune.ac.in या मेलवर त्वरित संपर्क साधावा.

१६. विद्यापीठ संकेतस्थळावरून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना महाविद्यालये/परिसंस्थानी सर्व संबंधितांच्या तात्काळ निदर्शनास आणाव्यात.

१७. उन्हाळी सत्र २०२६ च्या परीक्षेचे अर्ज टप्प्या टप्याने सुरु होणार असून त्यासंदर्भात विद्यापीठ संकेतस्थळावरून वेळोवेळी अवलोकन करणे आवश्यक आहे जेणेकरुन कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही.

**(प्रा. डॉ. प्रभाकर देसाई)**
**प्रभारी संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**Savitribai Phule Pune University**

*(Formerly University of Pune)*

परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
दूरध्वनी क. (०२०) २५६२ १३९८
Website: www.unipune.ac.in

**Board of Examinations & Evaluation**
Ganeshkhind, Pune – 411 007
Telephone: (020) 2562 1398
E-mail: coe@unipune.ac.in
bee@unipune.ac.in


संदर्भ क्र.: परीक्षा/छावता/ ४33

दिनांक : २८/०३/२०२६

प्रति

**मा. प्राचार्य/संचालक,**
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
प्रस्तुत विद्यापीठ
(पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्हा व दादरा-नगर हवेली)

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील उन्हाळी सत्र २०२६ परीक्षा अर्ज : टप्पा क्रमांक १**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील परीक्षा अर्ज सुरू करण्यात येत आहेत. सुरवातीस शनिवार दिनांक २८/०३/२०२६, दुपारी २.०० पासून सोबत जोडलेल्या यादीतील अभ्यासक्रमांचे उन्हाळी सत्र २०२६ परीक्षांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया व वेळापत्रक याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे.

| विद्यार्थ्यांनै परीक्षा अर्ज ऑनलाईन भरण्याचा विनाविलंब कालावधी | महाविद्यालय/परिसंस्थेने विनाविलंब परीक्षा अर्ज कायम (Inward) करण्याचा व विद्यार्थ्यांने विनाविलंब परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम कालावधी | विद्यार्थ्यांनै परीक्षा अर्ज ऑनलाईन भरण्याचा विलंब कालावधी | महाविद्यालय/परिसंस्थेने विलंब परीक्षा अर्ज कायम (Inward) करण्याचा व विद्यार्थ्यांने विलंब परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम कालावधी | विद्यार्थ्यांनै परीक्षा अर्ज ऑनलाईन भरण्याचा अतिविलंब कालावधी | महाविद्यालय/परिसंस्थेने अतिविलंब परीक्षा अर्ज कायम (Inward) करण्याचा व विद्यार्थ्यांने अतिविलंब परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| **२८/३/२०२६ दुपारी २ पासून ते ६/४/२०२६** | **२८/३/२०२६ ते ७/४/२०२६** | **७/४/२०२६ ते ८/४/२०२६** | **८/४/२०२६ ते ९/४/२०२६** | **९/४/२०२६ ते १०/४/२०२५ दुपारी १२ पर्यत** | **९/४/२०२६ ते १०/४/२०२६** |

कळावे,

आपला,

(प्रा. डॉ. प्रभाकर देसाई)
प्रभारी संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**सोबत :**
१)शनिवार दिनांक २८/३/२०२६, दुपारी २.०० पासून परीक्षा अर्ज सुरू होणाऱ्या अभ्यासक्रमांची यादी.
२)शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील उन्हाळी सत्र २०२६ परीक्षा अर्जाबाबत मार्गदर्शक सूचना

शनिवार दिनांक २८/०३/२०२६, दुपारी २.०० पासून परीक्षा अर्ज सुरू होणाऱ्या अभ्यासक्रमांची यादी.

| Sr.No. | Faculty_Name | Pattern_Name |
|---|---|---|
| 1 | Commerce and Management | BACHELOR OF COMMERCE 2019 Credit Pattern |
| 2 | Commerce and Management | B.B.A. 2019 Credit Pattern |
| 3 | Commerce and Management | B.B.A.( Computer Application) 2019 Credit Pattern |
| 4 | Commerce and Management | B.B.A.( International Business ) 2019 Credit Pattern |
| 5 | Science and Technology | B.Sc. (Biotech) 2019 Credit Pattern |
| 6 | Science and Technology | B.Sc. (Computer Science) 2019 Credit Pattern |
| 7 | Science and Technology | B.Sc.(Cyber and Digital Science) |
| 8 | Science and Technology | B.Sc.(Hospitality Studies) 2019 Credit Pattern |
| 9 | Science and Technology | B.Sc.(REGULAR) 2019 Credit Pattern |
| 10 | Science and Technology | BSc(Animation)(REV.2021) |
| 11 | Science and Technology | BCA (Science) 2019 Credit Pattern |
| 12 | Humanities | BACHELOR OF ARTS 2019 Credit Pattern |
| 13 | Commerce and Management | BHMCT Credit Pattern 2019 |
| 14 | Commerce and Management | M.B.A.(Human Resource Development)(Rev.2020) |
| 15 | Commerce and Management | M.B.A.(Information Technology)(Rev.2020) |
| 16 | Commerce and Management | MBA (DIGITAL MARKETING) |
| 17 | Commerce and Management | MBA (FINTECH) |
| 18 | Commerce and Management | MBA (SERVICES MANAGEMENT) |
| 19 | Commerce and Management | MBA 2019(Revised) CREDIT PATTERN |
| 20 | Science and Technology | MCA ENGG. 2020 Credit Pattern |
| 21 | Commerce and Management | MCA(MANAGEMENT)(Rev.2020) |
| 22 | Commerce and Management | PGDCM 2022 Credit Pattern |
| 23 | Commerce and Management | PGDHM Credit Pattern 2019 |

(प्रा. डॉ. प्रभाकर देसाई)
प्रभारी संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दिनांक : २८/०३/२०२६

## शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील उन्हाळी सत्र २०२६ परीक्षा अर्जाबाबत मार्गदर्शक सूचना

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील उन्हाळी सत्र २०२६ चे परीक्षा अर्ज विविध टप्प्यात सुरू करण्यात येत आहेत, त्यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना पुढीलप्रमाणे :—

१. सर्व अभ्यासक्रमांचे विहित शुल्क, विलंबशुल्क आणि अतिविलंब शुल्कासह परीक्षा अर्ज विहित मुदतीतच संबंधित लिंकद्वारे ऑनलाईन पद्धतीने भरण्याची व कायम करण्याची प्रक्रिया विद्यार्थी व महाविद्यालय/परिसंस्थानी काटेकोरपणे पार पाडावी.

२. संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेने आपल्या महाविद्यालयातील एकूण विद्यार्थी आणि विषयवार विभागांचे प्रमुख तसेच विषयशिक्षक यांचे प्रमाण लक्षात घेऊन प्रत्येक प्राध्यापकास किमान २५ विद्यार्थी किंवा त्या प्रमाणात नेमून द्यावेत आणि अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज तपासून खात्री करण्याची सर्व प्रकारची जबाबदारी संबंधित विभाग/विभाग प्रमुख व विषय प्राध्यापकावर निश्चित करावी, म्हणजे यामुळे विद्यार्थ्याने भरलेला व सादर केलेला अर्ज बिनचूकपणे तपासून कायम (Inward) करता येईल.

३. यानुसार विद्यार्थ्याने परीक्षा अर्ज ऑनलाईन भरण्यापूर्वी अथवा ऑनलाईन भरण्याच्या पहिल्या दिवशी प्रत्येक महाविद्यालयाने/परिसंस्थेने परीक्षा अधिकारी यांच्या साहाय्यासाठी प्रत्येक विषयाचे विभागप्रमुख, प्रत्येक विषयाचे प्राध्यापक यांच्या मदतीने प्रत्येक वर्गाचे अभ्यासक्रमांच्या पॅटर्ननुसार त्या त्या सत्रातील परीक्षा अर्जात कोणकोणते विषय असावेत, त्याचे अनुक्रमांक आणि त्यासंदर्भातील सर्व माहिती याचे प्रारूप महाविद्यालयातील प्रत्येक प्राध्यापकास, प्रत्येक विद्यार्थ्यास आणि परीक्षा प्रक्रियेत सहभागी कार्यालयीन कर्मचाऱ्यास उपलब्ध करावे. यामुळे संबंधित विद्यार्थ्यास आपला परीक्षा अर्ज भरणे आणि २५ विद्यार्थी नेमून दिलेल्या प्राध्यापकास तो तपासून देणे व परीक्षा प्रक्रियेत सहभागी कार्यालयास तो कायम करणे नेमकेपणाने शक्य होईल.

४. महाविद्यालय/परिसंस्थेतील प्रत्येक विद्यार्थी लॉगिनद्वारे स्वत:च्या प्रोफाईलमधून परीक्षा अर्ज भरण्याच्या लिंकवर प्रवेशित होईल. प्रोफाईलमधून जी माहिती परीक्षा अर्जावर अवतीर्ण झाली आहे त्याची खातरजमा संबंधित विद्यार्थ्याने करावी आणि त्यानंतर संबंधित विद्यार्थी स्वत:च्या अभ्यासपत्रिकांची (Courses) खात्री करून परीक्षा अर्ज भरेल. त्यानंतर परीक्षा अर्ज महाविद्यालयाच्या यंत्रणेकडून तपासून घेण्यासाठी संबंधित विद्यार्थी आपला Preview अशी अक्षरे असलेला अर्ज प्रिंट करेल आणि महाविद्यालयातून तपासून घेईल.

५. विद्यार्थ्याकडून ऑनलाईन भरलेला अर्ज अथवा प्रिंट काढून सादर केलेला अर्ज महाविद्यालयाच्या डॅशबोर्डवर अंकित होताच महाविद्यालयाने संबंधित अर्ज तात्काळ तपासून तो कायम करणे अनिवार्य आहे. यासाठी प्रत्येकी २५ विद्यार्थ्यांचा ऑनलाईन ग्रुप तयार करण्याची आणि त्यावर नियत्रंण ठेवण्याची जबाबदारी नेमलेल्या प्राध्यापकावर सोपवावी.

६. प्रत्येक विद्यार्थ्याच्या परीक्षा अर्जात नमूद विद्यार्थ्याचे नाव, अभ्यासक्रमाचे नाव, अभ्यासपत्रिकांची नावे (Courses), अभ्यासपत्रिकांचा कोड, विद्याशाखा, लेखी (Theory), प्रात्यक्षिक (Practical), सत्रांतर्गत लेखी परीक्षा (Insem), मौखिक (Oral), सत्रकार्य (Termwork), प्रबंधिका (Dissertation), प्रकल्प (Project), क्षेत्रीय प्रकल्प (Field Project), कामकाजकालीन अनुभवाचे प्रशिक्षण (On Job Training), संशोधन प्रकल्प (Research Project), Tutorial यासह संबंधित अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने ज्या बाबी अथवा निर्देश आवश्यक आहेत ते तपासून सदर अर्ज तात्काळ कायम (Inward) करणे अनिवार्य आहे.

७. महाविद्यालयाने/परिसंस्थेने परीक्षा अर्ज कायम (Inward) केल्यानंतरच संबंधित विद्यार्थ्यांस ईमेल अथवा टेक्स्ट मेसेजद्वारा सूचना मिळेल, त्यानंतर विद्यार्थ्याने स्वत:च्या प्रोफाईलमध्ये लॉगिन करुन ऑनलाईन स्वरुपात उपलब्ध असलेल्या गेटवेद्वारे खालील रकान्यात नमूद केलेल्या कालावधीत परीक्षाशुल्क भरणे अनिवार्य आहे. अन्यथा संबंधित विद्यार्थ्यास आपोआप विलंब अथवा अतिविलंब शुल्क अदा करावे लागेल.

८. विद्यार्थ्याने ऑनलाईन परीक्षाशुल्क भरल्यानंतर सदर विद्यार्थ्याचा परीक्षा अर्ज परीक्षाविषयक पुढील प्रक्रियेकरिता कायम होईल आणि त्यानुसार त्याचे परीक्षेसाठीचे ओळखपत्र तयार होईल.

९. विद्यार्थ्याने परीक्षा अर्ज अचूक भरावा आणि परीक्षा अर्ज अचूक भरल्याची खातरजमाही संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेने करावी. परीक्षा अर्ज कायम झाल्यानंतर परीक्षा ओळखपत्रामध्ये कोणत्याही परिस्थितीमध्ये बदल/सुधारणा करता येणार नसल्यामुळे याची काटेकोरपणे दक्षता संबंधितांनी घ्यावी. परीक्षा अर्ज कायम केल्यानंतर अभ्यासपत्रिका नोंद अथवा काढून टाकण्याची सुविधाही कोणत्याही परिस्थितीत देण्यात येणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

१०. **महाविद्यालया/परिसंस्थेने वर दर्शवल्याप्रमाणे कोणत्याही टप्प्यावर परीक्षा अर्ज कायम (Inward) केल्यानंतर विद्यार्थ्यांनी तात्काळ परीक्षा शुल्क ऑनलाईन स्वरुपात अदा करणे अनिवार्य आहे.** अन्यथा संबंधित विद्यार्थ्यांस आपोआप त्यापुढील विलंब/अतिविलंब शुल्क आकारले जाईल. तसेच विहीत मुदतीनंतर विद्यार्थी परीक्षा अर्ज व परीक्षा शुल्क भरू शकणार नाहीत आणि पर्यायाने संबंधित विद्यार्थ्याचा परीक्षा अर्ज विद्यापीठाकडे जमा होणार नाही आणि विद्यार्थ्यास परीक्षेपासून वंचित रहावे लागेल, याची विद्यार्थ्यांनी व संबंधित सर्व घटकांनी नोंद घ्यावी.

तसेच विद्यार्थ्याने परीक्षा अर्ज वेळेत भरून महाविद्यालय/परिसंस्थेकडे ऑनलाईन जमा केल्यावर आणि Preview Print सादर केल्यावर जर संबंधित महाविद्यालया/परिसंस्थेकडून विद्यार्थ्याचा अर्ज विशिष्ट परीक्षा अर्ज प्रक्रिया पत्रकात दिलेल्या कालमर्यादेत कायम झाला नाही तर संबंधित विद्यार्थ्यास भराव्या लागणाऱ्या विलंब अथवा अतिविलंब शुल्काचा भार आपोआपच महाविद्यालय/परिसंस्थेवर पडेल.

११. सर्व महाविद्यालये/परिसंस्था, प्राचार्य/संचालक, प्राध्यापक, विभागप्रमुख, महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी, परीक्षा सहायक कर्मचारी, विद्यार्थी व पालक यांना आवाहन करण्यात येते की, महाविद्यालय/परिसंस्थेतील सर्व पात्र विद्यार्थ्यांचे/पाल्यांचे विहित मुदतीत अचूक परीक्षा अर्ज भरणे, तपासून कायम करणे आणि परीक्षा शुल्कही विहित कालावधीतच ऑनलाईन स्वरूपात भरणे; तसेच कोणताही पात्र विद्यार्थी/पाल्य परीक्षेपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

तसेच विहित मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत परीक्षा अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ मिळणार नाही. कारण अशी मुदतवाढ झाल्यास परीक्षार्थी ओळखपत्र, बारकोड जुळणी आणि परीक्षार्थीच्या अभ्यासविषयांची निश्चिती करताना समस्या निर्माण होतात. परिणामी प्राचार्य/संचालक, विभागप्रमुख, प्राध्यापक, परीक्षा अधिकारी, विद्यार्थी यांनाच स्थानिक पातळीवर रोषास सामोरे जावे लागते; पर्यायाने विद्यापीठ परीक्षा आयोजनावरही आणि त्याअनुषंगाने परीक्षा निकालांवर विपरित परिणाम होतो.

१२. उन्हाळी सत्र २०२६ परीक्षांचे अर्ज कायम करताना संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेने परीक्षार्थी विद्यार्थ्याची ७५टक्के उपस्थिती किंवा विशेष परिस्थितीत उपस्थिती विषयी नियमानुसार क्षमापित प्रक्रिया करून जी उपस्थिती अध्यादेशानुसार मान्य आहे ती आणि सत्रपूर्ततेची काळजी घेणे अनिवार्य असून यासंदर्भातील सर्व कागदपत्रे महाविद्यालय स्तरावर जतन करून ठेवणे बंधनकारक आहे. यासंदर्भातील सर्व जबाबदारी प्राचार्य/संचालक यांची राहील. तसेच अर्ज कायम केल्यानंतर ज्या विद्यार्थ्यांची हजेरी ७५टक्के पेक्षा कमी असेल अशा विद्यार्थ्यांचे अर्ज मागे घेण्यासाठी प्रस्ताव महाविद्यालयानी पाठवू नयेत.

१३. महाविद्यालय/परिसंस्थेतील विद्यार्थी प्रथम सत्रामध्ये काही कारणास्तव परीक्षा अर्ज भरण्यापासून वंचित राहिले असतील परंतु त्यांनी त्यांचे शैक्षणिक काम पूर्ण केले असेल अशा विद्यार्थ्यांचे दोन्ही सत्रांचे एकत्रित परीक्षा अर्ज भरण्यासाठी महाविद्यालयामार्फत त्यांच्या दोन्ही सत्रातील अंतर्गत मूल्यमापन पूर्ण झाले असून या विद्यार्थ्यांची दोन्ही सत्रामध्ये हजेरी ही ७५ टक्के पेक्षा जास्त असल्याचे हमी पत्र देऊन परीक्षा विभागात विहीत मुदतीत जमा करावे. परीक्षा विभागामार्फत दोन्ही सत्राचे एकत्रित परीक्षा अर्ज उपलब्ध करुन देण्यात येईल.

१४. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या बाबतीत परीक्षा अर्ज कायम करताना महाविद्यालय/परिसंस्था स्तरावर यासंदर्भातील सर्व कागदपत्रे जतन करणे आणि परीक्षा नियोजन कालावधीत संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षाकालीन अनुरूप सुविधा उपलब्ध करून देणे, वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय/परिपत्रक/पत्रानुसार बंधनकारक आहे, याची नोंद घ्यावी.

१५. परीक्षा अर्ज भरण्यातील प्रक्रियेदरम्यान येणाऱ्या अडचणी व त्रुटींसाठी ०२०-७१५३३६३३ या दूरध्वनीवर अथवा examsupport@pun.unipune.ac.in या मेलवर त्वरित संपर्क साधावा.

१६. विद्यापीठ संकेतस्थळावरून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना महाविद्यालये/परिसंस्थानी सर्व संबंधितांच्या तात्काळ निदर्शनास आणाव्यात.

१७. उन्हाळी सत्र २०२६ च्या परीक्षेचे अर्ज टप्प्या टप्याने सुरु होणार असून त्यासंदर्भात विद्यापीठ संकेतस्थळावरून वेळोवेळी अवलोकन करणे आवश्यक आहे जेणेकरुन कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही.

(प्रा. डॉ. प्रभाकर देसाई)
प्रभारी संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ